# जादू अरोमाथेरपीची

त्यात आताचा जमाना ठरला यंग लुकचा! जाहिरातीतून आणि टीव्ही मालिकांमधूनही हेच बिंबवलं जातंय. त्यामुळे उत्तम आरोग्याच्या पायावर सौंदर्याची इमारत बांधण्याचं लक्ष्य कोणत्याही वयातल्या स्त्रीने ठेवलं तर त्यात काय वाईट आहे?

युथफुल चेहऱ्यासाठी बाह्यसौंदर्याबरोबर प्रत्येकीने आंतरिक सौंदर्याचीही काळजी घेतली पाहिजे. मग ती गृहिणी असो वा नोकरी करणारी. आज मीडिया, एअरलाइन्स, पंचतारांकित हॉटेल्स इत्यादी ग्लॅमरच्या क्षेत्रातच नाही तर कोणत्याही नोकरीमध्ये मागणी आहे ती उत्तम व्यक्तिमत्त्वाची!

काळाची ही गरज लक्षात घेऊन सीमा जेराजानी हिने 'फ्युजन्स' या ब्युटी सलोनची संकल्पना अस्तित्वात आणली. आज ठिकठिकाणी अद्ययावत ब्युटी सलोन्स दिसत असताना 'फ्युजन्स'मध्ये वेगळं काय, असा प्रश्न पडणं स्वाभाविक आहे. प्रामाणिक वृत्ती आणि इसेन्शिअल ऑइल्स म्हणजेच अरोमाथेरपीचा वापर ही इथली खासियत म्हणता येईल. तसंच फ्युजन्स अकादमीमध्ये या सगळ्याचं शिक्षणही घेता येतं. तेही एकावेळी फक्त चार ते पाच विद्यार्थी! इथे ब्युटी ट्रीटमेण्ट्सबरोबर बॉडी मसाज, फूट मसाज, मेकअप, हेअर कट्स, कलरिंग इत्यादींसह होलिस्टिक हिलिंगही केलं जातं. सकारात्मक दृष्टीकोन कसा ठेवायचा याचंही मार्गदर्शन केलं जातं. त्यासाठी खास तज्ज्ञ नेमले आहेत. हे सलोन जुहूच्या एसएनडीटी कॉलेजसमोर आहे.



आजच्या घडीला ब्युटी ट्रीटमेण्ट्स, मेकअप आणि हेअर या विषयांमध्ये सीमा जेराजानी ही मुंबईतच नाही तर देशामध्ये सर्वात उच्चशिक्षित आहे. इंग्लंडमध्ये तिने याचं शिक्षण घेतलेलं असून जगप्रसिद्ध 'शॅनेल'मधून मेकअप/हेअरचं शिक्षण घेतलेलं आहे. अरोमाथेरपीचा कोर्स तिने अमेरिकेतून केला आहे आणि गेली १३ वर्षं ती ब्युटी तज्ज्ञ म्हणून कार्यरत आहे.

वेगवेगळी सुवासिक फुलं आणि देठांपासून बनवलेल्या तेलांचा सौंदर्यशास्त्रात वापर करण्याची पद्धत ग्रीक, रोमन आणि इजिप्तच्या लोकांनी हजारो वर्षांपूर्वी आणली. ते शास्त्र तेव्हा प्रचलित होतं पण मध्यंतराच्या काळात पुरेशा माहिती अभावी मागे पडलं. नंतर जेव्हा निवडक ब्युटिशियन्सने या तेलांचा वापर पुन्हा प्रचारात आणल्यावर अनेकांनी त्याच्याकडे नवीन शास्त्राच्या दृष्टीकोनातून पाहिलं. यालाच अरोमाथेरपी म्हटलं जातं. यातल्या इसेन्शियल ऑइल्सचा वापर सौंदर्य जोपासनेपुरताच मर्यादित नसून थकवा, डोकेदुखी, पोटदुखीसारख्या वेदनांचं शमन करण्याचीही ताकद आहे. शिवाय त्याच्या मंद सुगंधात मूड बदलण्याची किमयाही आहे. स्ट्रेसपासून मुक्ती मिळवून देण्यासाठी याचा चांगला उपयोग होतो. 'फक्त याचं सखोल ज्ञान आवश्यक आहे. इसेन्शिअल ऑइल्सचं मिश्रण योग्य प्रमाणात करता आलं पाहिजे,' असं सीमाचं म्हणणं आहे. अरोमाथेरपीच्या साहाय्याने पिंपल्स, डाग, पिग्मेण्टेशन, एजिंग स्किन, कोरडी त्वचा इत्यादी समस्या बऱ्या करता येतात. अरोमाथेरपीच्या ट्रीटमेण्ट्स खूप महागही नाहीत.

फक्त ती व्यक्ती त्यातली जाणकार हवी इतकंच. तेल अथवा जेलच्या स्वरूपात त्याचा वापर होतो. सीमाकडे विविध प्रकारची फेशिअल्स आहेत.

वाढत्या वयासाठी पॅराफिन फेशिअल, उन्हाने काळवंडलेल्या त्वचेसाठी ब्रायटनिंग फेशिअल, ग्लायकॉलिक पील्स, स्ट्रेस रिलीज थेरपी फेशिअल, व्हिटमिन 'सी' इत्यादी फेशिअल्स खरोखरच परिणामकारक आहेत. अर्थात अशी फेशिअल्स इतर ठिकाणीही असतील पण अरोमाथेरपीचा वापर आणि ते करण्याची पद्धत, त्याचा परिणाम दीर्घकाळ ठेवण्यास मदत करते. फेस पॅक्स, स्क्रब्स, मॉश्चरायजर त्या-त्या त्वचेच्या गरजेनुसार सीमा बनवते.

'प्रत्येकाच्या त्वचेचा पोत वेगळा असतो. त्यानुसार इसेन्शियल ऑइल्सचं मिश्रण करून मगच ते तिथल्या तिथे बनवलं जातं. त्यासाठी सगळी ऑइल्स मी अमेरिकेहून मागवते. तशी भारतीय ऑइल्ससुद्धा आहेत. पण ते ग्राहकांच्या बजेटप्रमाणे ठरवलं जातं,' सीमा सांगते. तिचा अरोमाथेरपी किंवा फळं यासारख्या नैसर्गिक पद्धतींवर गाढ विश्वास असून गोल्ड फेशिअल, पर्ल फेशिअल, बोटॉक्स इत्यादी ट्रीटमेण्ट्सवर विश्वास नाही. 'मोती किंवा सोनं त्वचेच्या आतपर्यंत कसं शोषलं जाईल? तेल, क्रीम, जेल... हे त्वचेत शोषली जाऊन मग त्याचा परिणाम दिसून येतो.' ती म्हणते. मेकअपमध्येही ती खूप बारकावे शोधून काम करते. आयत्यावेळी मेकअप करायला गेलं तर हवे ते परिणाम साधून येतातच असं नाही. पण सीमाच्या बाबतीत तसं घडत नाही कारण तिचा अनुभव तिचं काम चोख करतो. सुंदर दिसण्यासाठी सगळ्यांची धडपड असते आणि आज सौंदर्यशास्त्रही खूप ॲडव्हान्स आहे. फक्त योग्य तज्ज्ञाचं मार्गदर्शन हवं. मग जे जिंकायचं ठरवलंय ते का जिंकता येणार नाही?

– मॉस टीम